## L. A. BILL No. XLII OF 2023.

A BILL

TO AMEND THE SEEDS ACT, 1966, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

## सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२.

**बियाणे अधिनियम, १९६६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९६६ चा ५४.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, बियाणे अधिनियम, १९६६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

(शा.म.मु.) एचबी १३३५ (१०४०—८-२०२३)

सन १९६६ चा अधिनियम क्रमांक ५४ याच्या कलम १९ ची सुधारणा.

**२.** बियाणे अधिनियम, १९६६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम १९ मधील खंड (ख) व (ग) वगळण्यात येतील. १९६६ चा ५४.

सन १९६६ चा अधिनियम क्रमांक ५४ मध्ये नवीन कलम १९क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १९ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

विवक्षित अपराधांसाठी शिक्षा.

"**१९क.** (१) कलम १९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर कोणतीही व्यक्ती,—

(क) कलम ७ च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करीत असेल ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये नमुना घेण्यापासून बियाणे निरीक्षकास प्रतिबंध करीत असेल ; किंवा

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापासून बियाणे निरीक्षकास प्रतिबंध करीत असेल,

तर ती व्यक्ती, दोष सिद्धीनंतर,–

(एक) पहिल्या अपराधाकरिता, तीन महिन्यांपेक्षा कमी नसेल, परंतु तीन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा दहा हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, अथवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल ; आणि

(दोन) दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधांकरिता, सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल, परंतु पाच वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा पंचवीस हजार रुपयांपेक्षा कमी नसेल, परंतु एक लाख रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, अथवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(२) या अधिनियमात किंवा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध, दखलपात्र व अजामीनपात्र असेल.". १९७४ चा २.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

विवक्षित दर्जाच्या बियाण्यांची विक्री करण्याचे नियमन करण्यासाठी, आणि तत्संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता बियाणे अधिनियम, १९६६ (१९६६ चा ५४) अधिनियमित केला आहे. कोणत्याही अधिसूचित प्रकारच्या किंवा वाणाच्या कोणत्याही भेसळयुक्त, अप्रमाणित व गैर-छापाच्या बियाण्यांची विक्री व पुरवठा करण्यास, उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये मनाई केलेली आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम १९ मध्ये, अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन केल्याबद्दल शिक्षा करण्याची तरतूद केलेली आहे. कलम १९ खाली, पहिल्या अपराधासाठी, पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतका द्रव्यदंड आणि दुसऱ्या अपराधासाठी, सहा महिन्यांपर्यंत वाढवतील इतक्या मुदतीचा कारावास अथवा एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतका द्रव्यदंड, किंवा या दोन्ही शिक्षा आहे. या शिक्षा खूपच सौम्य आहेत.

३. बियाण्यांचे अनेक व्यापारी व विक्रेते, भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैर-छापाच्या बियाण्यांचे उत्पादन व विक्री करून, झटपट पैसे मिळवण्याकरिता, या सौम्य दंडात्मक तरतुदीचा गैरफायदा घेतात. अशा विक्रीमुळे, शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. असे व्यापारी व विक्रेते यांना पायबंद घालण्याकरिता भेसळयुक्त, अप्रमाणित किंवा गैर-छापाच्या बियाण्यांची विक्री व पुरवठा केल्याबद्दल कठोर शिक्षा करण्याकरिता तरतूद करण्यासाठी, आणि उक्त गुन्हा दखलपात्र व अजामिनपात्र करण्याकरिता बियाणे अधिनियम, १९६६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यामध्ये नवीन कलम समाविष्ट करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते.

४. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २ ऑगस्ट, २०२३.

**धनंजय मुंडे,**
कृषी मंत्री.

## सन २०२३ चे वि.स.वि.क्र. ४२ ----- बियाणे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ याचे परिशिष्ट.

## ( बियाणे अधिनियम, १९६६ यातील उतारे)

## (सन १९६६ चा अधिनियम ४४)

**१.** ते **१८.** * * * *

जर कोणतीही व्यक्ती,— शास्ती.

(क) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाचे उल्लंघन करीत असेल ; किंवा

(ख) या अधिनियमान्वये नमुना घेण्यापासून बियाणे निरीक्षकास प्रतिबंध करीत असेल ; किंवा

(ग) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये प्रदान केलेल्या अन्य कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यापासून बियाणे निरीक्षकास प्रतिबंधित करीत असेल तर,

ती व्यक्ती, दोषसिद्धी झाल्यावर,—

(एक) पहिल्या अपराधाकरिता, पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल तितक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, आणि

(दोन) अशा व्यक्तीला, या कलमाखालील अपराधाबद्दल यापूर्वी दोषसिद्ध ठरवण्यात आले असेल तर, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या, किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस, अथवा या दोन्ही शिक्षांस, पात्र असेल.

**२०.** ते **२५.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२.]**

**[बियाणे अधिनियम, १९६६, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

[ **श्री. धनंजय मुंडे,**
कृषी मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई